<u>आर.सी.सी. क्र.२८१/२०२२</u>
<u>नि.क्र. ३९</u>

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – युवराज लक्ष्मण मोरे
वय – ३९ वर्षे, व्यवसाय –दुकान
राहणार – वडझीरे, ता. पारनेर.

**<u>सरतपासणी विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए.पटेकर यांचेमार्फत</u>**–

दि.२४/३/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता मला सेंट्रल बँकेच्या वडझीरे शाखेत पोलीसांनी पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्यावेळी माझेसोबत बँकेतील स्टॉफ व माझ्या दुकानात काम करणारा उत्तम औटी सोबत होता. तो पंचनामा पैश्याची हेराफेरी झाल्यासंदर्भात होता. घटना बँकेतील ऑफीसर विद्या उघडे सांगत होत्या. त्यांनी जाधव यांनी बँकेसंदर्भात फ्रॉड केला आहे असे सांगितले. ज्या जागेवर पंचनामा केला ती बिलडींग बाबाजी येरंडे यांची होती. त्याचा गट नंबर किंवा सर्वे नंबर मला सांगता येणार नाही. त्या बँकेत २ कॅशीयरचे केबीन व एक मॅनेजरची केबीन होती. घटना स्थळेच्या पुर्वेला बोरकरांचा पडका वाडा, पश्चिमेला मोकळा चौक, दक्षिणेला हॉस्पीटल व उत्तरेला मोकळी जागा आहे. त्याठिकाणी पोलीसांनी त्यांच्यासोबत आलेल्या एक जणाने आमचे व बँकेच्या स्टाफचे साधारणतः ५/६ फोटो काढले. त्याठिकाणी पोलीस मॅडमने सांगितल्याप्रमाणे लिहुन घेत होते व त्यानंतर मी ते वाचले होते आणि त्यावर मी आणि माझ्यासोबत दुकानातील मुलाने सही केली होती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अ.क्र.१ वर माझी सही असुन त्यातील मजकुर मी वाचल्याप्रमाणे बरोबर आहे व तो माझ्यासमोर लिहीला आहे. त्यास नि.४० देण्यात येते. आता मला सदर ६ छायाचित्रे दाखवण्यात आली. त्यामध्ये मी असुन त्यास ओळखीसाठी आर्टीकल अ–१ ते अ–६ देण्यात येतो.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.एल. ठाणगे यांचेमार्फत</u>**

मी पहील्यापासुन वडझीरेचा रहीवासी असुन मला बँकेच्या जवळपास काय आहे याची माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी मला बँकेच्या स्टाफने बोलावले होते. त्याबाबत मला लेखी पत्र किंवा लेखी नोटीस दिले नव्हते व पोलीसांनीही तसे मला काही दिले नव्हते. मला सदर केसचा गुन्हा रजिस्टर नंबर सांगता येणार नाही. माझे दुकान बँकेच्या शेजारी असल्याने बँकेचा स्टाफ

माझ्याशी ब–यापैकी परिचीत आहे. गौतम जाधव बॅंकेत कधीपासुन ते कधीपर्यंत कामाला होते याची मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपीने नेमके काय केले आहे याची मला माहीती नाही.

घटनास्थळ बिलडींग फक्त बाबाजी येरंडे यांची आहे. त्याचे क्षेत्रफळ १५०० स्क्वेअर फुट असेल. मी तेथील रहीवासी असल्याने मला चतुःसिमा माहीत आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी बॅंकेत कोणत्या टेबलवर बसायचा याची मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावरुन कोणतेही कागदपत्र जप्त झालेले नाही. चतुःसिमेमध्ये असणा–या मोकळया जागेचा गट नंबर मला माहीत नाही. घटनास्थळ पंचनामा साधारण १२.३० पर्यंत चालु होता. हे म्हणणे खरे नाही की माझे बॅंकेच्या कर्मचा–यांशी ओळख असल्यामुळे मी त्यांच्यासाठी आज साक्ष द्यायला आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/–

(एन.एस.सबनीस)

दिनांकः २८/०६/२०२४.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.